The South Asian Academic Research Chronicle ISSN 2454-1109
A Refereed Interdisciplinary Indexed International Open Access Monthly e-Journal
Vol 11.Issue1 & 2; Jan-Feb 2024

# मराठी संत कवयित्रिंचे व्यक्तित्व आणि कर्तृत्व: एक अभ्यास

डॉ. शिवाजी आनंदराव सूर्यवंशी
यशवंत महाविद्यालय, नांदेड

मराठी साहित्यातील संत साहित्याची परंपरा अतिशय थोर आहे. संतांनी विपुल साहित्यरचना लिहीत असतानाच आपल्या अभंगाच्या माध्यमातून त्यांनी सामाजिक प्रबोधन सुद्धा केले. नैतिक मूल्यांची शिकवण देत असतानाच अंधश्रद्धा, चालीरीती यावर प्रहार करून समानतेचे तत्व अंगीकारण्याचा प्रयत्न केला. विशेषत: महिलांना स्वतःच्या भक्ती भावना व्यक्त करण्याची संधी मिळवून दिली. त्यामुळे अनेक संत कवयित्रींनी आपल्या भक्तीच्या व स्त्री म्हणून मिळालेल्या जीवनाच्या भावना उघडपणे व्यक्त केलेल्या दिसून येतात. संत परंपरेमध्ये अनेक संत कवयित्रींनी आपली एक आगळी वेगळी ओळख निर्माण केलेली आहे. त्यांच्या व्यक्तित्वाचा आणि कर्तृत्वाचा ठसा स्पष्टपणे संत साहित्यामध्ये दिसून येतो.

संत साहित्याच्या पूर्वी महिलांनी उघडपणे स्त्रियांचे दुःख आणि भावना व्यक्त केलेल्या दिसून येत नाहीत. त्यामुळे स्त्रियांनी लिहिलेल्या साहित्याला आणि त्याचबरोबर त्यांच्या कर्तृत्वाला नक्कीच विशेष महत्त्व आहे. त्याच अनुषंगाने प्रस्तुत शोधनिबंधामध्ये संत कवयित्रींचे व्यक्तित्व आणि कर्तृत्व शोधण्याचा प्रयत्न केला आहे. शोधनिबंधासाठी काही प्रमुख संत कवयित्रींचा विचार केला आहे. या संत कवयित्रीच्या माध्यमातून कशा पद्धतीने संत साहित्याला वेगळी ओळख प्राप्त झाली, या विषयाचाही शोध घेण्याचा प्रयत्न केला आहे. विशेषत: बहिणाबाई, जनाबाई, मुक्ताबाई, कान्होपात्रा त्याचबरोबर महदंबा या प्रमुख संत कवयित्रींच्या माध्यमातून त्यांचज व्यक्तित्व, कर्तृत्व शोधण्याबरोबरच सामाजिक दृष्टीने त्यांचे योगदान किती महत्त्वाचे होते, याचाही विचार करण्याचा प्रयत्न केला आहे.

**१) संत जनाबाई :**

संत साहित्यामध्ये संत जनाबाईंचे एक महत्त्वाचे स्थान आहे. वारकरी संप्रदायातील एक महत्त्वाच्या संत कवयित्री म्हणून त्यांची ओळख आहे. परभणी जिल्ह्यातील गंगाखेड येथे त्यांचा जन्म झाला. त्यांच्या आईचे नाव दमा तर वडिलांचे नाव करूंड असे होते. मुळात हे कुटुंब पांडुरंगाला मानणारे कुटुंब होते. जनाबाईचा सुरुवातीचा काळ अतिशय कष्टमय गेला. कारण बालवयातच जनाबाई या पोरक्या झाल्या. त्यांची आई आणि त्यांचे वडील दोघांचेही निधन त्या बालवयात असतानाच झाले. पुढे त्या सात वर्षांच्या असताना दामाशेटी यांच्याकडे त्यांना स्वाधीन करण्यात आले. पुढील त्यांचे पूर्ण जीवन दामाशेटी यांच्याकडेच गेले.

संत जनाबाईंना पुढील काळात संत नामदेवांचा सहवास लाभला. व त्या स्वतःला नाम्याची दासी असे म्हणून नामदेवांच्या सानिध्यामध्ये त्या राहू लागल्या. नामदेवांच्या सानिध्यामध्ये राहत असताना बऱ्याच वेळा त्यांना पंढरीच्या विठ्ठलाचे दर्शन झाले. त्यामुळे त्या विठ्ठल भक्त झाल्या. या माध्यमातून त्या अभंग रचना करू लागल्या. अभंगाच्या माध्यमातून त्या स्वतःच्या भावना, एक स्त्री म्हणून वाट्याला आलेलं जीवन, विठ्ठलाविषयीची भक्ती या सर्व बाबी आपल्या अभंगाच्या माध्यमातून त्या

व्यक्त करू लागल्या. आई वडील नसल्यामुळे विठ्ठल रुक्माईलाच त्या आपले आई वडील मानू लागल्या. "संत नामदेवांकडे जनाबाई झाडलोट करीत असे आणि कोणतेही काम करताना भगवंताचे नाम घेत असे. ती अत्यंत सज्जन होती"१

जनाबाईंनी मोठ्या प्रमाणात अभंग लिहायला सुरुवात केली. त्यांच्या नावावर आज ३५० एवढे अभंग उपलब्ध आहेत. अभंगाशिवाय त्यांनी कृष्णजन्म, प्रल्हादचरित्र, द्रौपदीस्वयंवर, हरिश्चंद्र आख्यान ही आख्यान काव्य देखील त्यांनी रचलेली आहेत. संत जनाबाईंनी अतिशय दर्जेदार अशा प्रकारचे अभंग रचले. संत नामदेवांच्या सहवासामध्ये त्यांनी विपुल अशी अभंग रचना केली. दासी झाल्यामुळे आपणाला विठ्ठलाची प्राप्ती झाल्याचे सुद्धा त्या म्हणत असत. संत नामदेवांच्या घरी १४ माणसे होती. त्यामध्ये जनाईची भर पडली. त्या स्वतः नाम्याची दासी म्हणून त्या कुटुंबामध्ये वावरू लागल्या. अनेक अभंगातून त्यांनी विठ्ठलाविषयीचे प्रेम व्यक्त केले. ज्या दिवशी त्यांना विठ्ठलाची सेवा मिळत नसे त्यादिवशी त्या विठ्ठला विषयीच्या भावना आपल्या अभंगातून व्यक्त करायच्या. "नाही केली सेवा ! दुःख वाटतसे जीवना!!" अशा प्रकारच्या विठ्ठला विषयीच्या भावना त्या आपल्या अभंगातून व्यक्त करताना दिसतात. नामदेवालाच त्या गुरु मानून आपलं जीवन जगू लागल्यामुळे नामदेवांच्या अनेक कार्यामध्ये त्या सहभागी होऊ लागल्या. अडीअडचणीला त्या पांडुरंगाची धाव घेत असत. त्यांच्या अभंगात फारसे पांडित्य नसले तरी साध्या सरळ अभंगातून त्यांनी आपल्या भावना आणि विठ्ठल भक्तीची ओढ व्यक्त केली. "विठू माझा लेकुरवाळा ! संगे गोपाळांचा मेळा !! हा त्यांचा अभंग विशेषत्वाने गाजला. "ये ग ये ग विठाबाई ! माझे पंढरीचे आई" याही अभंगाला त्यांच्या अतिशय महत्त्व प्राप्त झाले. संत साहित्यामध्ये अतिशय मोलाचे स्थान असलेल्या जनाबाईंनीज शक आषाढ वद्य १३ शके१२७२ म्हणजे इसवी सन १३५० साली समाधी घेतली.

**२) संत मुक्ताबाई :**

वारकरी संप्रदायातील एक महत्त्वाच्या संत कवयित्री म्हणून संत मुक्ताबई यांचा उल्लेख केला जातो. संत मुक्ताबाई यांचा जन्म आपेगाव या ठिकाणी इस .स. १२७९ साली झाला. त्यांच्या वडिलांचे नाव विठ्ठलपंत तर आईचे नाव रुक्मिणी असे होते. संत निवृत्तीनाथ, संत ज्ञानदेव, संत सोपानदेव या तिघांची बहीण म्हणून संत मुक्ताबाई यांची विशेषत्वाने ओळख आहे. "मुक्ताबाईचे भाऊ साक्षात ब्रह्मा, विष्णू आणि महेश आणि मुक्ताबाई ही प्रत्यक्षात आदिमाया आहे"२ संत मुक्ताबाईंच्या नावावर एकूण ४२ अभंग उपलब्ध आहेत. विशेषत: पंढरी महात्मे, नाम महात्मे, संत समागम या विषयावर त्यांनी अभंग रचना केलेली आहे. ताटीचे अभंग व कूट रचना त्यांच्या अतिशय गाजलेल्या आहेत.

लहान वयात मुक्ताबाईंनी खूप मोठी अभंग रचना करून संत साहित्यामध्ये आपली वेगळी ओळख निर्माण केली आहे. वयाने लहान असलेल्या मुक्ताबाईंचे अभंग योगानुभव व्यक्त करण्याबरोबरच गुड पद्धतीने व्यक्त होताना दिसतात. मोठ्या मोठ्या संतांना त्यांनी आपल्या अभंगाच्या माध्यमातून अनेक प्रकारचे प्रश्न विचारलेले दिसून येतात. योगी चांगदेवांचा अहंकार छोट्याशा मुक्ताबाईंनी कसा दूर केला याविषयीचा त्यांचा "मुंगी उडाली आकाशी! तिने गिळिले सूर्याशी!!" हा अभंग अत्यंत प्रसिद्ध आहे. शिवाय अखंड जयाला देवाचा शेजारी! का रे अहंकार नाही

केला!! असा प्रकट सवाल त्यांनी नामदेवाला विचारलेला दिसून येतो. त्यांच्या अभंगामधून स्त्रीसुलभ भावना व्यक्त झालेल्या आहेत. ज्ञानेश्वर रुसून बसल्यानंतर वयाने लहान असलेल्या मुक्ताबाईंनी ताटीचे अभंग रचून ज्ञानेश्वराची समज घालण्याचा प्रयत्न केला. "विश्वरागे झाले वनी! संती सुखी व्हावे पाणी!!" अशा प्रकारे ज्ञानेश्वरांना समज देऊन आपला समंजसपणा अभंगाच्या माध्यमातून त्यांनी व्यक्त केला. अशा अनेक महत्त्वपूर्ण रचना लिहिणाऱ्या संत मुक्ताबाई ह्या तापी तीरावरील माणगाव येथे इसवी सन १२९७ ला विद्युत रूपाने आंतरधान पावल्याचे मानले जाते. मेहून जिल्हा जळगाव येथे आज त्यांची समाधी उपलब्ध आहे.

**३) संत बहिणाबाई :**

संत परंपरेतील संत कवयित्रींचा विचार करत असताना सर्वप्रथम संत बहिणाबाईंच्या व्यक्तित्व आणि कर्तृत्वाचा विचार होणे आवश्यक आहे. कारण जन्म झाल्यापासून आयुष्याच्या शेवटपर्यंत त्यांनी प्रचंड अवहेलना व दुःख भोगले वय वर्ष तीन असतानाच त्यांचा विवाह शिउर येथील गंगाधर पाठक या एका तीस वर्षाच्या बीजवराशी झाला. तिथून पुढे त्यांना अनेक यातना सहन कराव्या लागल्या. मुळात त्यांचे पती रत्नाकर तथा गंगाधर पाठक हे भिक्षुक पद्धतीने जीवन जगत होते ज्योतिषाचा व्यवसाय करून आपली उपजीविका करणे अशा प्रवृत्तीचे त्यांचे पती गंगाधर पाठक हे होते. त्यांच्यावर प्रचंड प्रमाणात कर्ज होते एकीकडे तीन वर्षाची असलेली बहिणाबाई वयाने वाढत असतानाच दुसरीकडे तिच्या पतीवर असलेले कर्ज सुद्धा वाढत जाऊ लागले बघता बघता बहिणाबाई हा सात वर्षाचा झाल्या त्यावेळेस त्यांच्या पति वरील कर्ज हे खूप मोठ्या प्रमाणात वाढलेली होते अशा काळात काय करावे यासाठी त्यांनी घरदार विकून कर्जाचा पैसा फेडला तिथून पुढे त्या आपल्या नवऱ्यासोबत भिक्षुक पद्धतीने अनेक ठिकाणी भ्रमण करून जगू लागल्या या काळात त्यांनी पंढरपूर शिंगणापूर रहिमतपूर कोल्हापूर देहू असा प्रवास सुद्धा केला हा पूर्ण प्रवास भिक्षेच्या माध्यमातून त्यांनी त्यांच्या पतीसोबत केला त्यांच्या कुटुंबातील अन्यही व्यक्ती त्यांच्यासोबत या प्रवासामध्ये होते.

संत बहिणाबाई यांचा कालखंड सोळाशे अठ्ठावीस ते सतराशे असा आहे. बहिणाबाईंच्या जन्माविषयी विचार करावयाचे झाल्यास त्यांचा जन्म हा औरंगाबाद जिल्ह्यातील कन्नड तालुक्यातील देवगाव या ठिकाणी झाला होता. त्यांचे वडील हे तत्कालीन व्यवस्थेतील ग्रामसेवक होते. त्यांच्या आईचे नाव जानकी असे होते. असे एकूण जीवन आणि कौटुंबिक स्थिती बहिणाबाईंच्या वाट्याला आलेली होती. पुढील काळात भिक्षुक म्हणून जगत असताना कथा, कीर्तने, पुराणे आणि सत्पुरुषांची संगत त्यांना मिळत गेली. त्याचबरोबर त्यांचे वाचनही या काळात वाढत गेले. हा अस्थिरतेचा काळ असला तरी या काळात त्यांना परमार्थ वृत्ती लाभली अनेक ठिकाणी त्या देवस्थानामध्ये थांबू लागल्या. तेथील कीर्तन त्यांच्या कानावर येऊ लागले. याच काळात वयाच्या अठराव्या वर्षी संत तुकारामांचा स्वप्न दर्शनाच्या माध्यमातून त्यांना आशीर्वाद लाभला. त्यांच्यावर संत तुकारामांची कृपा झाली. त्या या माध्यमातून अभंग सुद्धा लिहू लागल्या पंढरपूरमध्ये त्यांनी जवळपास 14 वर्षे वास्तव्य केले. यावेळी त्यांना विविध प्रकारचे अनुभव आले. उत्तम कीर्तनकार त्यांना ऐकायला मिळालले. परिणामी त्या सुद्धा दर्जेदार अशा अभंगाची निर्मिती करू लागल्या. संतांच्या रचना त्यांच्या कानावर

येत असल्यामुळे संताविषयी त्यांच्या मनात आदर निर्माण होऊ लागला. "संत बहिणाबाईंचे चरित्र म्हणजे असा चमत्कार आहे की ती महायोगीनी म्हणून गाजली. तिचा मूळ पिंड योगभ्रष्टतेचा होता. तिचा योग योथगक प्रवास अनेक दैवी घटनांनी भरलेला आहे. अतिशय भावस्पर्शी आहे."३ तुकोबांचा फार मोठा प्रभाव त्यांच्यावर निर्माण झाला. याविषयी एका अभंगांमध्ये त्यांनी स्पष्टपणे लिहून ठेवले आहे.

"तुकोबाचे ध्यान पूर्वी कोल्हापुरी!
जे स्वप्न माघारी देखियेले!!
तेची ध्यान डोळा प्रत्यक्ष देखोनी!
आनंद लोचनी हेलावत!!"

संत बहिणाबाईंच्या नावावर एकूण ७२९ अभंग आहेत. त्यांची पंचतत्वाचा पाळणा ही रचना अतिशय गाजली. त्यांच्या काव्यामध्ये गौळणी, पाळणे, आरत्या यांचाही समावेश आहे. विविध प्रकारचे विषय त्यांनी आपल्या साहित्याच्या माध्यमातून हाताळले. वारकरी संप्रदायांमध्ये त्यांनी एका अभंगाच्या माध्यमातून आपली आगळी वेगळी ओळख निर्माण केली. त्यांचा तो अभंग आजही मोठ्या प्रमाणात नावाजलेला आहे.

संतकृपा झाली! इमारत फळा आली !!१!!
ज्ञानदेवे रचिला पाया ! उभारिले देवालया !!२!!.......
नामा तयाचा किंकर ! तेणे रचिले आवार !!३!!
जनार्दन एकनाथ! स्तंभ दिला भागवत !!४!!
तुका झालासे कळस ! भजन करा सावकाश !!५!!
बहिणी फडकती ध्वजा निरूपण केले ओंजळ !!६!!

या अभंगाच्या माध्यमातून संत बहिणाबाई यांनी आपली आगळी वेगळी ओळख संत साहित्यामध्ये निर्माण केली. त्यांनी विपुल प्रमाणात अभंग रचले. या अभंगाच्या माध्यमातून त्यांनी मराठी साहित्यमध्ये आपले योगदान दिले. त्यांच्या अभंगांमध्ये स्त्रीत्वाचे दुःख सुद्धा प्रकट झालेले आहे त्यामुळे तत्कालीन स्त्रियांच्या भावना कशा प्रकारच्या होत्या व त्यांच्या वाट्याला कोणत्या प्रकारचे जीवन होते याचाही बोध त्यांच्या अभंगाच्या माध्यमातून होतो.

**४) संत कान्होपात्रा :**

वारकरी संप्रदायाने अठरापगड जातीच्या लोकांना भक्तीचा मार्ग खुला करून दिला. वारकरी संप्रदायाने महिलांसाठी सुद्धा मुक्तपणे भक्ती करण्याची संधी प्राप्त करून दिली. याविषयीचे अनेक उदाहरणे आपणाला दिसून येतात. त्यापैकी एक महत्त्वाचे उदाहरण म्हणजे संत कान्होपात्रा. संत कान्होपात्रा हया एका गणिकेची मुलगी म्हणून ओळखल्या जातात. परंतु तिला गणिकेचे जगणे मान्य नव्हते. गणिकेचे जगणे नाकारून त्यांनी विठ्ठलाची भक्ती केली. आणि त्या माध्यमातून एक महत्त्वाची संत कवयित्री म्हणून त्या मराठी साहित्यामध्ये ओळखल्या जाऊ लागल्या. पंधरावे शतक हे

संतकानोपात्रांच्या कार्याचे शतक म्हणून ओळखले जाते. कान्होपात्रांच्या नावावर सुमारे २६ अभंग उपलब्ध आहेत.

पंढरपूर जवळील मंगळवेढे येथील शामा नावाच्या गणिकेची कन्या म्हणून तिचा जन्म झाला. परंतु गणिकेचे जगणे तिला मान्य नव्हते. त्यामुळे तिने विठ्ठल भक्तीचा ध्यास घेतला. विठ्ठलाच्या चरणी तनमन वाहून तिने अभंग रचना सुरू केली संत ज्ञानेश्वर, संत नामदेवांचे अभंग तिला खूप आवडायचे. ज्ञानेश्वरांच्या, नामदेवांच्या अभंगाचा प्रभाव तिच्यावर पडला आणि ती विठ्ठल भक्तीकडे ओढल्या गेली. तिचे सौंदर्य परिसरामध्ये खूप नावाजलेले होते. तिच्या रूपाची तोडी कोणीच करू शकत नाही, अशी चर्चा सुद्धा परिसरामध्ये पसरली होती. त्यामुळे ही सर्व चर्चा ऐकून बिदरच्या बादशहाने शिपायांना तिला आणण्यासाठी पाठवले. परंतु तिने राजाच्या दरबारी न जाता विठ्ठलाच्या चरणी आपला प्राण ठेवला. "ज्ञानदेव नामदेव प्रवर्तित आध्यात्मिक लोकशाहीतील उत्तरकालीन एक संत कवयित्री. ती वेश्येच्या कुळात जन्माला आली. तिच्या आईचे नाव श्यामा. पंढरपूरजवळच्या मंगळवेढा या गावी शामा राहत असे."४

दरम्यानच्या कालखंडात संत कान्होपात्रा यांनी विपुल प्रमाणात काव्यरचना केली. "नको देवराया अंत आता पाहू! प्राण हा सर्वथा फुटो पाहे!!१!!" हा त्यांचा अभंगा अतिशय गाजला. त्याशिवाय त्यांच्या अभंगाला संत साहित्यामध्ये मोठे महत्त्व प्राप्त झाले. त्यामध्ये 'पतीत पावन नाम ऐकुनी आलो मी द्वारा! पतीत पावन नव्हसी म्हणून जातो माघारा!! हे त्यांचे अभंग खूप गाजले. अतिशय खडतर जीवन संत कान्होपात्रांच्या वाट्याला आले. पंढरपूरच्या देवालयाच्या दक्षिण द्वाराशी आज त्यांची समाधी उपलब्ध आहे. त्या जागेवर आलेला वृक्ष हा कान्होपात्रा च्या भक्तांसाठी कान्होपात्राच्या त्यागाची साक्ष म्हणून उभा असलेला दिसून येतो. त्यांचा "कनवाळू कृपाळू तू मायु. माऊली! धावूनिया भेटली विठाबाई!! हा सुद्धा अभंग मोठ्या प्रमाणात गाजलेला आहे. विठ्ठलाकडे एक स्त्री म्हणून त्यांनी आपली दुःखे सातत्याने मांडली आहेत. आपल्या दुःखाचा शेवट करावा आणि आपणाला न्याय द्यावा अशी भावना सुद्धा त्यांच्या अभंगांमध्ये दिसून येते. विशेष म्हणजे स्त्री म्हणून जन्माला आलेले दुःख व त्याचबरोबरच एक गणिकेची मुलगी म्हणून जन्माला आल्याचे दुःख आपल्या अभंगातून त्या व्यक्त करतात. संत कान्होपात्रा आपल्या अभंगाच्या माध्यमातून स्वतःच्या अंतरकरणातील व्याकुळता विठ्ठलापुढे निर्मळ अंतकरणाने व्यक्त करताना दिसून येतात.

संदर्भ ग्रंथ :

१) १०१ श्रेष्ठ महिला संक्षिप्तचरित्र आणि विचारधन - सौ. माधवी कवी - विद्याभारती प्रकाशन लातूर - पृष्ठ २२
२) संत कवयित्री - डॉ. भगवान कौठेकर - निर्मल प्रकाशन नांदेड - पृष्ठ ९८
३) तत्रैव - पृष्ठ ७
४) निवडक अभंग ज्ञानेश्वर ते तुकाराम - संपादन विद्यासागर पाटंगणकर - साकेत प्रकाशन औरंगाबाद - पृष्ठ - १००

**मराठी संत कवयित्रिंचे व्यक्तित्व आणि कर्तृत्व : एक अभ्यास**

डॉ. शिवाजी आनंदराव सूर्यवंशी